महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०-२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

महाज्योती
ज्ञानदीप लावू जगी

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/ 2008 /२०२५-२६

दिनांक - 23/06/2025

# परिपत्रक

**विषय : विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी हेल्प डेस्क (कॉल सेंटर विभाग) स्थापन करणेबाबत.**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत संघ लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) मार्फत घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा, संयुक्त गट (ब व क) व अभियांत्रिकी सेवा परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण, यु.जी.सी./ सी. एस. आय. आर. नेट, एम.एच.-सेट पूर्व प्रशिक्षण, ए.बी.ए.सेट पूर्व प्रशिक्षण, Staff Selection Commission Combined Graduate Level (SSC-CGL) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण, IBPS बँक परीक्षापूर्व प्रशिक्षण, मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण, जेईई,नीट,एम.एच-सीईटी पूर्व प्रशिक्षण, व्यावसायिक वैमानिक प्रशिक्षण, कौशल्य विकास प्रशिक्षण, पीएचडी करिता अर्थसहाय्य, मातोश्री मुलींचे वसतिगृह नाशिक तसेच एमपीएससी व युपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या मुख्य व मुलाखत परीक्षेकिरता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना एकरकमी अर्थसहाय्य व इतर उपक्रम राबविण्यात येतात.

सदर प्रशिक्षणाबाबतच्या सूचना महाज्योतीच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येतात. यामध्ये विद्यार्थ्यांना योजनेसंबंधित विविध समस्या निर्माण होतात. विद्यार्थ्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी महाज्योती मार्फत महाज्योतीच्या मुख्य कार्यालय नागपूर येथे हेल्प डेस्क म्हणून कॉल सेंटर विभाग स्थापन करण्यात आलेले आहे. सदर विभागात एकूण १० टेलीफोन असून विभागात कार्यरत कर्मचारी यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना उद्भवणाऱ्या प्रश्नांचे निराकरण करण्यात येईल जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये तसेच विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार नाही. तसेच संपर्क साधणाऱ्या विद्यार्थ्यास महाज्योती मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती सुद्धा देण्यात येईल. यामुळे संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची अचूक माहिती इतर मागास वर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत/नागरिकांपर्यंत पोहचविण्यात येईल.

**महाज्योती हेल्प डेस्क क्र.**

१) ०७१२-२८७०१२०

२) ०७१२-२८७०१२१

Pawge

**प्रशांत वावगे**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर**